## ::संकेतस्थळावरील माहिती::

या विभागातील मुंबई कार्यालयातील वाहनचालक गट-क वेतनश्रेणी एस-६ (१९,९००-६३,२००) या संवर्गातील सरळसेवेच्या कोटयातील नियमित पदभरतीच्या अनुषंगाने एकाकी रिक्त पद नियमित स्वरुपात भरण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज मागविण्यांत येत आहेत.

२. उपलब्ध पदसंख्या -०१

३. एकाकी पद

४. वेतनश्रेणी एस-६ (१९,९००-६३,२००)

५. वयोमर्यादा दि.०१ जून-२०२३ रोजी ३८ वर्षापेक्षा जास्त नाही.

६. शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि इतर आवश्यक अटी शर्ती:-

अ. शासन मान्यता प्राप्त शाळेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

ब. मोटार वाहन अधिनियम १९८८ (१९८८ चा ५९) मधील तरतुदीनुसार सक्षम अनुज्ञप्ती प्राधिकारी यांनी दिलेल्या हलके मोटार वाहन किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन चालविण्यासाठी परवाना धारण केलेला असणे आवश्यक आहे.

क. शासकीय, निमशासकीय किंवा खाजगी संस्थेमध्ये हलके मोटार वाहन किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन चालविण्याचा ३ वर्षाहून कमी नाही इतक्या कालावधीचा अनुभव धारण केलेला असणे आवश्यक आहे.

ड. मोटार वाहन दुरुस्तीचे जुजबी ज्ञान आवश्यक आहे.

इ. वाहन चालविण्याचा स्वच्छ अभिलेख जसे की,

I) वाहनचालक कोणतीही मादक द्रव्ये किंवा अल्कोहोल सेवन करुन वाहन चालविण्याचा किंवा मोटार वाहन अधिनियम,१९८८ (१९८८ चा ५९) मधील कोणत्याही दखल पात्र अपराधासाठी दोषी सिध्द झालेला नसावा.

II) वाहनचालकाविरुध्द अपघातातचा गुन्हा दाखल झालेला नसावा.

ई. चांगली शारीरीक क्षमता असणे आवश्यक आहे.

फ. संबंधित वाहनचालकास निबंधक भागीदारी संस्था, नवीन प्रशासकीय इमारत, ६ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे, (पुर्व) मुंबई ४०० ०५१ येथे काम करावे लागेल. यानुषंगाने वाहनचालकास संबंधित क्षेत्राची परिपूर्ण भौगोलिक माहिती असणे आवश्यक आहे.

ग. मराठी हिंदी भाषा वाचता, बोलता व इंग्रजी भाषा वाचता येणे आवश्यक आहे.

ह. शारीरिकदृष्टयाा पात्र असणे आवश्यक असुन रातआंधळेपणा व रंगआंधळेपणा या व्याधीनी ग्रस्त नसावा.

कृ.मा.प.

७. वाहनचालक पदावर नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने वाहन चालविण्याची चाचणी उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

८. उमेदवाराने सदर पदाकरीता अर्ज सोबत जोडलेल्या नमुन्यात कोऱ्या कागदावर सुवाच्च अक्षरात लिहावा अथवा टंकलेखित करावा.

९. उमेदवाराने सदर पदाकरीता जाहिरातीच्या दिनांकापासुन १५ दिवसांत विहित नमुन्यात निबंधक भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई, नवीन प्रशासकीय इमारत, ६ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पुर्व), मुंबई-४०० ०५१ या पत्त्यावर कार्यालयीन वेळेत पोहोचेल अशा रितीने पाठवावा. अधिक माहितीसाठी ०२२-२०८६१०१५ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर तसेच विहित नमुन्यात नसलेल्या व अनावश्यक कागदपत्र जोडलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांचा तपशील अर्जाच्या नमुन्यासोबत जोडण्यात आलेले आहे.

१०. वाहनचालक पदाच्या निवडीबाबतचे सर्व अधिकार निबंधक भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे असतील. याबाबत कोणत्याही प्रकारचा राजकीय अथवा सामाजिक दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास संबंधित उमेदवारास निवड प्रक्रियेतून बाद ठरविण्यांत येईल.

-------------

# अर्जाचा नमुना

निबंधक भागीदारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मुंबई येथे गट-क, वाहनचालक संवर्गाच्या पदावर नियमित नियुक्ती करण्यांबाबत

उमेदवाराने अलिकडच्या
काळातील स्वत:चे
छायाचित्र येथे लावावे.

१. अर्जदाराचे संपूर्ण नाव:-

२. अर्जदाराचा पत्ता:-

३. सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम:-

४. भ्रमणध्वनी क्रमांक:-

५. जन्म दिनांक व वय:-

६. शैक्षणिक अर्हता:-

७. अनुभव

८. उपरोक्त पदावर नियमित नियुक्तीबाबत जाहिरात/सुचना मी काळजीपुर्वक वाचली असुन सदर सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण:-

दिनांक:- अर्जदाराची स्वाक्षरी

सोबत जोडावयाची कागदपत्रे:-

१. वयाचा दाखला.
२. शासन मान्यता प्राप्त शाळेतून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण.
३. हलके मोटार वाहन किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन चालविण्यासाठी परवाना.
४. अनुभव प्रमाणपत्र.